दै. "अॅग्रोवन" १९ ३१/१२/२०२२.

# अकोट बाजारात कापूस दहा हजार प्रति क्विंटल

ॲग्रोवन वृत्तसेवा



अकोला : यंदाच्या हंगामात पिकवलेला कापूस सध्या चांगला दर मिळवत आहे. गेल्या काही दिवसांपासून जिल्ह्यातील अकोट बाजारात कापसाचा दर सातत्याने दहा हजारांवर मिळत आहे. दोन दिवसांपूर्वी या ठिकाणी १०,७०० पर्यंत प्रति क्विंटलला दर मिळाला. शनिवारी (ता.२९) हा दर १०,५०० पर्यंत मिळाल्याची माहिती सूत्रांकडून मिळाली.

अकोट कृषी उत्पन्न बाजार समितीत खुल्या पद्धतीची कापूस हर्राशी केली जाते. या बाजारात चालू हंगामात सुमारे पावणेदोन लाख क्विंटलपर्यंत कापूस खरेदी झाली आहे. सध्याही दिवसाला तीन ते साडेतीन हजार क्विंटल कापूस दररोज विक्रीला येत आहे.

सध्या कापसाचा दर सातत्याने दहा हजारांवर मिळत आहे. अकोटमध्ये जिनिंग उद्योग सक्रिय असल्याने तेथील व्यापारी कापसाची खरेदी करीत असतात. दर योग्य मिळत असल्याने या बाजारात आता अकोला जिल्ह्यासह अमरावती, बुलडाणा व इतर जिल्ह्यांतूनही कापसाची आवक होत आहे. दररोज शेकडो वाहने अकोट बाजार समितीत उभी असल्याची बघायला मिळत आहेत.

या हंगामातील कापूस विक्री सध्या जोरावर आहे. कापूस राखून ठेवलेल्या शेतकऱ्यांना आता अनेक छोटे व्यापारी खेडा खरेदी करून कापूस अकोट बाजारात विक्रीला आणत आहेत. येथील खुल्या पद्धतीच्या हर्राशीमुळे चांगल्या दर्जाच्या कापसासाठी खरेदीदारांची चढाओढ बघायला मिळते. याच स्पर्धेतून कापूस सध्या दहा हजारांवर विकत आहे. बहुतांश कापूस या दराने जात आहे. चांगल्या दर्जाचा कापूस साडेदहा हजारांवर दर मिळवत आहे.

### अकोट बाजार कापूस विक्रीसाठी आकर्षण

या भागात कापसाला चांगला दर मिळवून देणारा बाजार म्हणून अकोटची ओळख मागील काही वर्षांत तयार झाली आहे. प्रामुख्याने येथील बाजारात स्थानिक व्यापारी मोठ्या संख्येने खरेदीसाठी पुढे आलेले आहेत. येथील जिनिंग उद्योगाला लागणारा कापूस स्थानिक पातळीवरच मिळू लागल्याने खरेदीसाठी व्यापाऱ्यात स्पर्धा लागलेली राहते. त्यातून शेतकऱ्यांच्या कापसाला इतर ठिकाणापेक्षा चांगला दर असल्याचे सांगितले जाते. परिणामी, शेतकरीही वेगवेगळ्या तालुक्यातून या ठिकाणी कापूस विक्रीला आणत आहेत.

# मानवत कृषी बाजार समितीत कापूस सरासरी ९९३० रुपयांवर

परभणी : मराठवाड्यातील कापसाची प्रसिद्ध बाजारपेठ असलेल्या मानवत कृषी उत्पन्न बाजार समितीमध्ये शनिवारी (ता. २९) कापसाची ३००० क्विंटल आवक होती. कापसाला प्रति क्विंटल किमान ८३०० ते कमाल १०,००० रुपये, तर सरासरी ९९३० रुपये दर मिळाले, अशी माहिती बाजार समितीच्या सूत्रांनी दिली.

मानवत बाजार समितीत शुक्रवारी (ता.२८) कापसाची ४००० क्विंटल आवक होती. कापसाला प्रति क्विंटल किमान ८२०० ते कमाल ९९५० रुपये, तर सरासरी ९८६० रुपये दर मिळाले. गुरुवारी (ता.२७) कापसाची ३६०० क्विंटल आवक होऊन प्रति क्विंटलला किमान ८२०० ते कमाल ९९८५ रुपये, तर सरासरी ९८७५ रुपये दर मिळाले. मंगळवारी (ता.२५) कापसाची २८०० क्विंटल आवक होऊन प्रति क्विंटलला किमान ८३०० ते कमाल ९८९५ रुपये, तर सरासरी ९८०० रुपये दर मिळाले. सोमवारी (ता.२४) कापसाची २५०० क्विंटल आवक होऊन प्रति क्विंटलला किमान ८४०० ते कमाल ९८६० रुपये, तर सरासरी ९७४० रुपये दर मिळाले. यंदाच्या (२०२०-२१) हंगामात आजवर एकूण २ लाख ४० हजार क्विंटल कापसाची खरेदी झाली, अशी माहिती बाजार समितीचे सभापती पंकज आंबेगावकर यांनी दिली.

दै. "लोकमत" दि. ३१/०१/२०२२.

पुणे

पुणे, सोमवार, दि. ३१ जानेवारी २०

# घरबसल्या मोबाईलवर बघा शेतमालाची आवक, बाजारभाव

## कृषी पणनचे 'एमएसएएमबी' ॲप सुरू : उपक्रमांची माहिती क्लिकवर

लोकमत न्यूज नेटवर्क

पुणे : कृषी पणन मंडळाच्या 'एमएसएएमबी' या सुधारित मोबाईल ॲपमुळे घरबसल्या शेतमालाची दैनंदिन आवक व बाजारभावाची माहिती मिळणार आहे. शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषी पणन मित्र मासिक, सर्व बाजार समित्यांची संक्षिप्त माहिती, शेतमाल विक्रेता व खरेदीदार, कृषी पणन मंडळ राबवत असलेले विविध प्रकल्प, योजना व उपक्रमांची माहिती यावर सहजरित्या मिळेल, अशी माहिती पणन संचालक सुनील पवार यांनी दिली.

सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते 'एमएसएएमबी' या सुधारित मोबाईल ॲपचे उद्घाटन करण्यात आले. यावेळी महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ सभापती व आमदार दिलीप मोहिते, सहकार आयुक्त अनिल कवडे, पणन संचालक सुनील पवार, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे उपस्थित होते.

### मोबाईल ॲपचे वैशिष्ट्य

- महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे मोबाईल ॲप 'गुगल प्ले स्टोअर' व 'ॲप स्टोअर'वर एमएसएएमबी (MSAMB) या नावाने मराठी व इंग्रजी या दोन भाषांत विनामूल्य उपलब्ध आहे.
- मोबाईल ॲपमुळे शेतकऱ्यांना शेतमालाचे बाजारभाव घरबसल्या उपलब्ध होणार आहेत.
- कृषी पणन मंडळ राबवत असलेले विविध प्रकल्प, योजना व उपक्रम तसेच बाजारभाव याबाबत माहिती शेतकरी, बाजार समित्या, बाजार घटक व सर्वसामान्यांना सहजरित्या उपलब्ध करुन देण्यासाठी कृषी पणन मंडळाने हे मोबाईल ॲप अद्ययावत केले आहे.
- शेतकऱ्यांना हवामानाचा व कृषी सल्ला मिळाला तर त्यांचे उत्पादन चांगले येण्यास मदत मिळणार आहे.



- शेतकऱ्यांना जर योग्य किंमती समजल्या तर त्यांनाही आपला माल कुठे घेऊन जावा, याचा अंदाज घेता येऊ शकणार आहे.
- राज्यातील व परराज्यातील बाजार समित्यांमध्ये होणारी शेतमालाची दैनंदिन आवक व बाजारभाव, शेतकरी उत्पादक कंपन्यांची माहिती, बाजार समित्यांची संक्षिप्त माहिती, कृषी पणन मित्र मासिक, फलोत्पादन निर्यात प्रशिक्षण, सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था आदी माहिती उपलब्ध आहे.
- राज्यातील सर्व बाजार समित्यांना त्यांच्या आवारात आवक होणाऱ्या शेतमालाची दैनंदिन आवक व बाजारभाव याबाबतची माहिती कृषी पणन मंडळाच्या ॲपद्वारे सहजरित्या भरता येणार आहे. सर्व बाजार समित्यांमधील बाजारभावाची माहिती एकत्रित करणे यामुळे सोईचे होणार आहे.
- शेतमालाची थेट विक्री अथवा खरेदी करण्यासाठी विक्रेता व त्याचा शेतमाल आणि खरेदीदार व त्याचा शेतमाल याबाबतची माहिती प्रसिद्ध करण्याची सुविधा उपलब्ध करुन दिली आहे.

दै. "अॅग्रोवन" दि. ३१।१।२०२२.

# घर बसल्या पाहा शेतीमालाचे दर

## पणन मंडळाच्या मोबाइल ॲपचे उद्‍घाटन

ॲग्रोवन वृत्तसेवा

पुणे : महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या सुधारित मोबाइल ॲपचे उद्‍घाटन सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या ॲपमुळे शेतकऱ्यांना शेतीमालाचे बाजारभाव घरबसल्या पाहता येणार असून, कृषी पणन विषयक माहिती ही त्यावर उपलब्ध आहे. शेतकऱ्यांनी या ॲपचा वापर करावा, असे आवाहन पाटील यांनी या वेळी केले.

पणन मंडळ राबवीत असलेले विविध प्रकल्प, योजना, उपक्रम आणि बाजारभावांची माहिती शेतकरी, बाजार समित्या, बाजार घटक व सर्वसामान्यांना उपलब्ध करून देण्यासाठी कृषी पणन मंडळाने हे ॲप अद्ययावत केले आहे. त्याच्या उद्‍घाटन प्रसंगी आमदार दिलीप मोहिते, सहकार आयुक्त अनिल कवडे, पणन संचालक सुनील पवार, पणनचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे आदी उपस्थित होते.

सुनील पवार म्हणाले, "राज्यातील सर्व बाजार समित्यांना त्यांच्या आवारात होणाऱ्या शेतीमालाची दैनिक आवक व बाजारभाव या ॲपवर सहज भरता येणार आहे. त्यामुळे बाजार समित्यांमधील बाजारभावाची माहिती एकत्रित मिळणे सोयीचे होणार आहे. शेतीमालाची थेट विक्री अथवा खरेदी करण्यासाठी विक्रेता व त्याचा शेतीमाल आणि खरेदीदार आदींबाबत माहिती प्रसिद्ध करण्याची सुविधाही या ॲपवर उपलब्ध करून देण्यात आली आहे. 'गुगल प्ले स्टोअर'वर MSAMB या नावाने मराठी व इंग्रजी भाषांत हे ॲप विनामूल्य उपलब्ध आहे.

### ही माहिती मिळणार

- शेतीमालाची दैनिक आवक व बाजारभाव
- शेतकरी उत्पादक कंपन्या, कृषी पणन मित्र मासिक
- राज्यातील सर्व बाजार समित्यांची संक्षिप्त माहिती
- शेतीमाल विक्रेता व खरेदीदार
- कृषी पणन मंडळ राबवीत असलेले विविध प्रकल्प, योजना व उपक्रम



दै. "पुण्यनगरी" दि. ३१।१।२०२२.

# अद्ययावत ॲपद्वारे शेतकऱ्यांना आता घरबसल्या बाजारभाव

**पुणे :** मोबाइल ॲपमुळे शेतकऱ्यांना शेतमालाचे बाजारभाव घरबसल्या उपलब्ध होणार आहेत. शेतमालाचे बाजारभाव व कृषी पणनविषयक माहिती उपलब्ध असलेल्या या मोबाइल ॲपचा शेतकरी बांधवांनी मोठ्याप्रमाणावर वापर करावा, असे आवाहन पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले.

सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या सुधारीत मोबाइल ॲपचे उद्घाटन करण्यात आले. याप्रसंगी आमदार व महाराष्ट्र राज्य बाजार समिती सहकारी संघ सभापती दिलीप मोहिते, सहकार आयुक्त व निबंधक सहकारी संस्था अनिल कवडे पणन संचालक तथा कार्यकारी संचालक महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ सुनील पवार, महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे, नाबार्ड व डी. एम. आय.चे प्रतिनिधी आदी उपस्थित होते.



सध्या मोबइलचा वापर मोठ्याप्रमाणावर होत असून, आवश्यक माहिती एसएमएस अथवा ॲपद्वारे सहज उपलब्ध होत आहे. शेतकरीदेखील मोठ्या प्रमाणावर मोबाइलचा वापर करत आहेत. कृषी पणन मंडळ राबवित असलेले विविध प्रकल्प, योजना व उपक्रम, तसेच बाजारभाव याबाबत माहिती शेतकरी, बाजार समित्या, बाजार घटक व सर्वसामान्यांना सहजरीत्या उपलब्ध करून देण्यासाठी कृषी पणन मंडळाने मोबाइल ॲप अद्ययावत केले आहे.

## परराज्यातील भावही समजणार

या ॲपद्वारे कृषी पणन मंडळाच्या माहिती व्यतिरिक्त राज्यातील व इतर राज्यातील बाजार समित्यांमध्ये होणारी शेतमालाची दैनिक आवक व बाजारभाव, शेतकरी उत्पादक कंपन्यांची माहिती, बाजार समित्यांची संक्षिप्त माहिती, कृषी पणन मित्र मासिक, फलोत्पादन निर्यात प्रशिक्षण, सुगी पश्चात तंत्रज्ञान संस्था आदी माहिती उपलब्ध आहे. राज्यातील सर्व बाजार समित्यांना त्यांच्या आवारात आवक होणाऱ्या शेतमालाची दैनिक आवक व बाजारभाव याबाबत माहिती कृषी पणन मंडळाच्या ॲपद्वारे सहजरीत्या भरता येणार आहे. यामुळे राज्यातील सर्व बाजार समित्यांमधील बाजारभावाची माहिती एकत्रित करणे सोईचे होणार आहे. शेतमालाची थेट विक्री अथवा खरेदी करण्यासाठी विक्रेता व त्याचा शेतमाल आणि खरेदीदार व त्याचा शेतमाल याबाबत माहिती प्रसिद्ध करण्याची सुविधा या ॲपद्वारे उपलब्ध करून देण्यात आली आहे.

दै. "सकाळ" दि. ३०/१/२०२२.

# घरबसल्या मिळणार शेतमालाचे बाजारभाव

## कृषी पणन मंडळाच्या अद्ययावत ॲपचे उद्‌घाटन; लाभ घेण्याचे शेतकऱ्यांना आवाहन

**मार्केट यार्ड, ता. २९ :** महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळाच्या सुधारित मोबाईल ॲपचे उद्घाटन सहकार व पणन मंत्री बाळासाहेब पाटील यांच्या हस्ते करण्यात आले. या ॲपमुळे शेतकऱ्यांना शेतमालाचे बाजारभाव घरबसल्या पाहता येणार असून कृषी पणन विषयक माहितीही त्यावर उपलब्ध आहे. शेतकऱ्यांनी या ॲपचा वापर करावा, असे आवाहन पाटील यांनी या वेळी केले.

पणन मंडळ राबवीत असलेले विविध प्रकल्प, योजना, उपक्रम आणि बाजारभावांची माहिती शेतकरी, बाजार समित्या, बाजार घटक व सर्वसामान्यांना उपलब्ध करून देण्यासाठी कृषी पणन मंडळाने हे ॲप अद्ययावत केले आहे. त्याच्या उद्घाटनप्रसंगी आमदार दिलीपराव मोहिते, सहकार आयुक्त अनिल कवडे, पणन संचालक सुनील पवार, पणनचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे आदी उपस्थित होते.

सुनील पवार म्हणाले, "राज्यातील सर्व बाजार समित्यांना त्यांच्या आवारात होणाऱ्या शेतमालाची दैनिक आवक व बाजारभाव या ॲपवर सहज भरता येणार आहे. यामुळे बाजार समित्यांमधील बाजारभावाची माहिती एकत्रित मिळणे सोईचे होणार आहे. शेतमालाची थेट विक्री अथवा खरेदी करण्यासाठी विक्रेता व त्याचा शेतमाल आणि खरेदीदार आदींबाबत माहिती प्रसिद्ध करण्याची सुविधाही या ॲपवर उपलब्ध करून देण्यात आली आहे."

### ही माहिती मिळणार

१. शेतमालाची दैनिक आवक व बाजारभाव
२. शेतकरी उत्पादक कंपन्या
३. कृषी पणन मित्र मासिक
४. राज्यातील सर्व बाजार समित्यांची संक्षिप्त माहिती
५. शेतमाल विक्रेता व खरेदीदार
६. कृषी पणन मंडळ राबवीत असलेले विविध प्रकल्प, योजना व उपक्रम



'गुगल प्ले स्टोअर'वर MSAMB या नावाने मराठी व इंग्रजी भाषांत हे ॲप विनामूल्य उपलब्ध आहे.

दै. "पुढारी"
दि. ३०/१/२०२२.

# ‘पणन मंडळाच्या ॲपचा वापर वाढवा’



**पुणे :** कृषी पणन मंडळाचे मोबाईल ॲप गुगल प्लेस्टोअर व ॲप स्टोअरवर MSAMB या नावाने विनामूल्य उपलब्ध आहे. या मोबाईल ॲपमुळे शेतकऱ्यांना शेतमालाचे बाजारभाव घरबसल्या उपलब्ध होणार आहेत. या ॲपचा शेतकऱ्यांनी वापर करण्याचे आवाहन सहकार व पणनमंत्री बाळासाहेब पाटील यांनी केले.

पणन मंडळाच्या सुधारित मोबाईल ॲपचे उद्घाटन शनिवारी (दि. २९) त्यांच्या हस्ते मार्केट यार्डातील मुख्यालयात झाले, त्यावेळी ते बोलत होते. या वेळी राज्य बाजार समिती सहकारी संघाचे सभापती आमदार दिलीप मोहिते पाटील, सहकार आयुक्त अनिल कवडे, पणन संचालक आणि पणन मंडळाचे कार्यकारी संचालक सुनील पवार, मंडळाचे सरव्यवस्थापक दीपक शिंदे व अन्य प्रतिनिधी उपस्थित होते.

दै. "पुण्यनगरी" दि. ३०।१।२०२२.

# सोलापूर बाजार समितीचा आशिया खंडात विक्रम

सोलापूर : भारतातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ म्हणून उदयास आलेल्या सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीने शनिवारी आशिया खंडात नवा विक्रम नोंदविला. बाजार समितीच्या स्थापनेपासून ते आजवरचे सर्व विक्रम मोडित निघाले असून, काल एकाच दिवशी १२६७ ट्रकमधून तब्बल १ लाख २६ हजार ७६० क्विंटल कांद्याची उच्चांकी आवक झाली. मोठ्या प्रमाणात आवक वाढल्याने दरात प्रतिक्विंटल चारशे रुपयांची घसरण झाली.

## एकाच दिवशी १२६७ ट्रक कांद्याची आवक ■ १७ कोटी ११ लाखांची उलाढाल



१० जानेवारीपासून सोलापूर कृषी उत्पन्न बाजार समितीत कांद्याची उच्चांकी आवक होत आहे. गेल्या दोन वर्षांतील कोरोना संकटानंतर मागील २० दिवसांपासून सोलापूर बाजार समितीत कांद्याची विक्रमी आवक होत आहे. वाशी, पुणे, नाशिक बाजार समित्यांनंतर महाराष्ट्रातील तिसऱ्या क्रमांकाची बाजार समिती म्हणून सोलापूर बाजार समितीची राज्यभरात ओळख आहे. भारतातील सर्वात मोठी कांदा बाजारपेठ म्हणून सोलापूर बाजार समितीने

▸▸ पान ९ वर

### राज्याच्या दुप्पट आवक

महाराष्ट्रात एकूण ३६५ बाजार समित्या आहेत. शनिवारी सोलापूर बाजार समिती वगळता अन्य इतर सर्व बाजार समित्यांमध्ये ६५ हजार क्विंटल कांद्याची आवक झाली. तर, एका सोलापूर बाजार समितीत त्याच्या दुप्पट म्हणजेच १ लाख २६ हजार ७६० क्विंटल कांद्याची आवक झाली.

### ठळक बाबी

- शनिवारी एकाच दिवशी १२६७ ट्रकमधून तब्बल १ लाख २६ हजार ७६० क्विंटल कांद्याची उच्चांकी आवक.
- ५ हजार २९९ शेतकऱ्यांनी विक्रीसाठी आणला कांदा
- एकाच दिवशी मोडले आजवरचे सर्व रेकॉर्ड
- आवक वाढल्याने दरात प्रतिक्विंटल चारशे रुपयांची घसरण
- १७ कोटी ११ लाख रुपयांची विक्रमी उलाढाल

दै. "पुण्यनगरी" दि. १०/१/२०२२.

# आता भारतीय आंबे - डाळिंबांची अमेरिकेत होणार विक्री

**नवी दिल्ली** : कृषी बाजारपेठांमध्ये प्रवेशासाठी झालेल्या सुधारणांमुळे भारत आणि अमेरिका व्यापार आणि वाणिज्य व्यवहारांना नवी चालना मिळाली असून याअंतर्गत आता भारतीय आंबे आणि डाळिंबांना अमेरिकी बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळाला आहे. परस्परांकडे शेतकी बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळवण्यासंबंधी अंमलबजावणीच्या आराखडा करारावर भारताचा कृषी आणि शेतकरी कल्याण विभाग आणि अमेरिकेचा कृषी विभाग यांनी स्वाक्षऱ्या केल्या आहेत.



भारत-अमेरिका व्यापार धोरण मंचाच्या बाराव्या बैठकीच्या पार्श्वभूमीवर, भारताचा कृषी आणि शेतकरी कल्याण विभाग आणि अमेरिकेचा कृषी विभाग यांनी, परस्परांकडे कृषी बाजारपेठांमध्ये प्रवेश मिळवण्यासंबंधी अंमलबजावणीच्या आराखडा करारावर स्वाक्षऱ्या केल्या आहेत. यानुसार, भारतीय आंबे आणि डाळिंबांना तसेच डाळिंबाच्या दाण्यांना परीक्षणपश्चात बाजारपेठ प्रवेश मिळणार आहे. तर अमेरिकेच्या चेरी आणि अल्फाल्फा गवताला भारतात प्रवेश मिळणार आहे. जानेवारी-फेब्रुवारी २०२२ पासून आंबे आणि डाळिंबांची निर्यात सुरू होत असून डाळिंबाच्या दाण्यांची निर्यात एप्रिल २०२२ पासून सुरू होणार आहे. तर अमेरिकेतून चेरी आणि अल्फाल्फा गवताची निर्यात एप्रिल २०२२ पासून सुरू होणार आहे. त्याशिवाय, मंत्रीस्तरीय चर्चांच्या आधारे, पशुपालन आणि दुग्धव्यवसाय विभागानेही अमेरिकी डुकराच्या मांसाला बाजारप्रवेश देण्याची तयारी दाखवली आहे. याला अंतिम स्वरूप देण्यासाठी आरोग्य आणि स्वच्छता विषयक अंतिम प्रमाणपत्राची स्वाक्षऱ्या झालेली प्रत दाखल करण्याची विनंती विभागाने केली आहे.

दै. "अॅग्रोवन" दि. ८/१/२०२२.

# बाजार समित्यांना खबरदारीच्या सूचना

अॅग्रोवन वृत्तसेवा

**पुणे** : देशासह राज्यात कोरोनाचा व्हेरिअंट असलेल्या ओमिक्रॉनचा फैलाव वाढत आहे. गर्दीच्या ठिकाणांवर नियंत्रण आणण्याच्या सूचना केंद्र सरकारसह राज्याच्या टास्क फोर्सने दिल्या आहेत. कृषी उत्पन्न बाजार समित्यांनाही आदेश देण्यात आल्या आहेत. त्यामुळे सर्वच बाजार समित्यांनी खबरदारीच्या उपाययोजना कराव्यात, अशा सूचना पणन संचालक सुनील पवार यांनी केल्या आहेत.

कोरोनाच्या दोन्ही लाटांमध्ये बाजार समित्या काही प्रमाणात बंद राहिल्याने शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले होते. या संकटात अनेक बाजार समित्यांनी स्थानिक प्रशासनासोबत समन्वय साधत खबरदारीच्या विविध उपाययोजना केल्या होत्या. तो अनुभव लक्षात घेता, बाजार समित्यांनी कामकाज करावे, अशा सूचना पणन संचालकांनी दिल्या आहेत.

राज्यात पुणे, मुंबई, नाशिक, नागपूर, नगर या मोठ्या बाजार समित्या असून, या बाजार समित्यांमध्ये रोज हजारो शेतकरी, ग्राहक, खरेदीदारांची मोठी गर्दी होत असते. ओमिक्रॉनचा धोका ओळखून बाजार समित्यांनी त्यांचे कर्मचारी, आडते, हमाल, संघटनांनी त्यांचे कर्मचाऱ्यांच्या चाचण्या करण्यावर भर द्यावा, ज्यांनी लसीकरणाचा दुसरा डोस घेतला नाही, त्यांनी तो तातडीने घ्यावा. लसीकरणासाठी बाजार समित्यांनी स्थानिक प्रशासननासोबत समन्वय साधत मोहिमेचे आयोजन करावे, अशा सूचना देण्यात आल्या आहेत.

**“ कोरोना संकटात पुणे बाजार समिती सुरू ठेवण्याचा पॅटर्न आम्ही विकसित केला आहे. हा अनुभव आमच्या पाठीशी असून, ओमिक्रॉनचा फैलाव होऊ नये यासाठी विविध खबरदारी आणि उपाययोजनांसाठी आम्ही सज्ज आहोत. या बाबत सर्व घटकांसोबत संवाद समन्वय सुरू आहे.**

**-मधुकांत गरड,**
प्रशासक, पुणे बाजार समिती